# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः21.04.2025** **वारःसोमवार**

---

1. जम्मू आणि काश्मीरच्या रामबन जिल्ह्यात झालेल्या ढग फुटीमुळे अनेक ठिकाणी भूस्खलन, तीन जणांचा मृत्यू, मदत आणि बचाव कार्य सुरू
2. अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स आजपासून चार दिवसांच्या भारतभेटीवर
3. थेट हस्तांतरण प्रक्रियेदवारे पैसे देण्याच्या योजनेमुळे गळती रोखण्यात मोठ यश-केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती आणि
4. आंतरराष्ट्रीय नेमबाजी विश्व करंडक स्पर्धेत 10 मीटर एअर रायफल प्रकारातील मिश्र दुहेरीत भारताच्या रुद्रांक्ष पाटील आणि आर्या बोस यांना रौप्य पदक

**जम्मू काश्मीर**

जम्मू आणि काश्मीरच्या रामबन जिल्ह्यात सेरी बागन इथं झालेल्या ढग फुटी सदृश्य मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी भूस्खलन झालं असून त्यात तिघांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन लहान मुल आणि एक वृद्धाचा समावेश आहे तर आतापर्यंत 100 नागरिकांची सुटका करण्यात आली आहे. या दुर्घटनेमुळे रामबन जिल्ह्यातील अनेक घरांच आणि रस्त्यांचं नुकसान झाल आहे. श्रीनगर- जम्मू राष्ट्रीय महामार्गावरही अनेक वाहनांच आणि रस्त्याच्या काही भागाच भूस्खलनाने नुकसान झाल. देशाच्या इतर भागांशी काश्मीरला जोडणारा हा राष्ट्रीय महामार्ग कालपासून वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला असून, तो पुन्हा टप्प्या टप्प्याने सुरू करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्याला पर्यायी राष्ट्रीय महामार्ग मुगल रोड हलक्या वाहनांसाठी खुला करण्यात आला आहे.

दरम्यान, भारतीय सैन्य दलाच्या मदतीने स्थानिक प्रशासनातर्फे मदत आणि बचाव कार्य आज सकाळपासून पुनः सुरू करण्यात येणार आहे. तरी प्रतिकूल हवामानामुळे कालपासून बचाव कार्यात अडथळे येत आहेत. जम्मू काश्मीर राज्यात अनेक भागात काल झालेल्या मुसळधार पावसाने, गारपीटीने आणि त्यामुळे आलेल्या पुरामुळे सफरचंद आणि ऑर्किडच्या बागांच मोठ नुकसान झाल आहे. या दुर्घटनेबद्दल जम्मू काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी तीव्र दुःख व्यक्त केल आहे.

आजही काश्मीर खोऱ्यात जोरदार वृष्टि होण्याचा इशारा हवामान विभागाने दिला असून, त्या पार्श्वभूमीवर, काश्मीर मधील शाळांना आज सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. लडाखमध्ये ही कालपासून जोरदार हिमवृष्टी आणि गारपीट होत असून, त्यामुळे अनेक ठिकाणचं जनजीवन विस्कळीत झालं आहे. पुढचे काही दिवस हिमवादळाची शक्यताही हवामान खात्यानं वर्तवली असून सर्व यंत्रणांना सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत.

**नागरी सेवा दिन-पंतप्रधान**

आज 17 वा नागरी सेवा दिन आहे. यानिमित्त नवी दिल्लीत होणाऱ्या मुख्य कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रशासकीय सेवेतील उत्कृष्टता पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या वर्षी जिल्ह्याचा सर्वांगीण विकास, आकांक्षित तालुके

कार्यक्रम आणि नागरी सेवेतील नवोन्मेष या तीन श्रेणींमध्ये एकंदर 16 पुरस्कार दिले जाणार आहेत. 1947 मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांनी आजच्याच दिवशी म्हणजे 21 एप्रिल रोजी प्रशिक्षणार्थी प्रशासकीय अधिकाऱ्यांना उद्देशून भाषण केलं होतं. त्याच्या स्मृतीनिमित्त 21 एप्रिल हा नागरी सेवा दिन म्हणून साजरा केला जातो.

**पंतप्रधान दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्यापासून दोन दिवसांच्या सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्याअंतर्गत उद्या ते जेद्दाह इथं पोहोचतील. गेल्या 40 वर्षांमध्ये जेद्दाह या सौदी अरेबियाच्या व्यावसायिक केंद्राला भारताचे पंतप्रधान मोदी प्रथमच भेट देणार आहेत.

**व्हान्स दौरा**

अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स आजपासून चार दिवसांच्या भारतभेटीवर येत आहेत. आज संध्याकाळी नवी दिल्लीत ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमवेत द्विपक्षीय चर्चा करतील. यावेळी दोन्ही नेत्यांदरम्यान परस्पर संबंध आणखी दृढ करण्याच्या उपायांबाबत चर्चा होण्याची शक्यता आहे. तसंच परस्परहिताच्या क्षेत्रिय आणि जागतिक घडामोडींबाबतही दोन्ही नेते चर्चा करण्याची शक्यता आहे. गेल्या फेब्रुवारी महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेच्या दौऱ्यावर असताना दोन्ही देशांच्या नेत्यांनी संयुक्त निवेदन दिलं होतं. त्या निवेदनातील उपाययोजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची संधी, व्हान्स यांच्या या भेटीमुळे मिळेल. या दौऱ्यात जे. डी. व्हान्स आणि त्यांचं शिष्टमंडळ जयपूर आणि आग्र्यालाही भेट देणार आहे.

**भेट**

भारताच्या भेटीवर असलेले भूतान नरेश जिग्मे खेसर नामग्येल वांगचुक यांनी काल आसामला भेट दिली. या भेटीत त्यांनी जोगिघोपा इथल्या अंतर्देशीय जलमार्ग तळ आणि मल्टी मॉडेल लॉजिस्टिक्स पार्कमधील सोयी सुविधांची पाहणी करून, त्याविषयी माहिती घेतली.

**अश्विनी वैष्णव**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेने देशात सुरू केलेल्या विविध कल्याणकारी योजनांच्या लाभार्थींना त्यांच्या बँक खात्यात थेट हस्तांतरण प्रक्रियेदवारे पैसे देण्याच्या योजनेमुळे देशाचे आतापर्यंत 3 लाख 48 हजार कोटी रुपये वाचले आहेत आणि पैशयची गळती रोखण्यात मोठ यश मिळाल आहे अशी माहिती केंद्रीय माहिती तंत्र ज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. या संदर्भात प्रसिद्ध केलेल्या धोरणात्मक अहवालाचा संदर्भ देत त्यांनी समाज माध्यमावर संदेशद्वारे ही माहिती दिली आहे. या डीबीटी अर्थात थेट हस्तांतरण प्रक्रियेदवारे पैसे देण्याच्या योजनेमुळे प्रशासनात पारदर्शकता वाढली असून 2013 पूर्वी पेक्षा विविध योजनांचे लाभार्थी 16 पटीने वाढले असल्याच ही वैष्णव यांनी सांगितल.

**वक्फ कायदा**

वक्फ सुधारणा कायदा भाजपने समाजात फूट पाडण्यासाठी आणला आहे, असा आरोप कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला. बिहार जिल्ह्यातील बक्सरमधे आयोजित जाहीर सभेत ते काल बालत होते. बिहारच्या विकासा साठी केंद्रातल्या मोदी सरकारने जाहीर केलेल सव्वा लाख कोटी रुपयांच पॅकेज ही धूळफेक असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

दरम्यान, बिहारचे भाजप प्रदेशाध्यक्ष दिलीप जयस्वाल यांनी या आरोपंच खंडन केल आहे. वक्फ सुधारणा कायद्याबाबत कॉंग्रेस नागरिकांना चुकीच्या दिशेने नेऊन भरकवटत आहे अस जयस्वाल म्हणाले. पश्चिम बंगालमध्ये वक्फ सुधारणा कायद्याचा निषेध करण्यासाठी नुकत्याच झालेल्या आंदोलन आणि हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना शांत राहण्याच तसच कुठल्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याच आवाहन मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केल आहे. या हिंसाचारात दोषी आढळण्याऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई केली जाईल अस आश्वासन ही त्यांनी दिल आहे.

**भाजपा-वक्फ**

अलीकडेच मंजूर झालेल्या वक्फ सुधारणा कायद्यामुळे होणाऱ्या फायद्यांविषयी, विशेषतः मुस्लिमांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी भारतीय जनता पक्षानं देशव्यापी मोहीम सुरू केली आहे. येत्या 5 मे पर्यंत ही मोहीम सुरू राहणार आहे. या संदर्भात नवी दिल्ली इथल्या पक्षाच्या मुख्यालयात अलीकडेच देशभरातील भाजप पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा पार पडली.

**मराठी कान**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने फ्रान्समधील कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी चार मराठी चित्रपटांची निवड केली आहे. यात 'स्थळ', 'स्नो फ्लॉवर' आणि 'खालिद का शिवाजी' या तीन मराठी चित्रपटांचा समावेश आहे. तसंच 'जुनं फर्निचर' या चित्रपटाची विशेष निवड करण्यात आल्याची घोषणा, सांस्कृतिक कार्य मंत्री अँड आशिष शेलार यांनी काल दादर इथं पत्रकार परिषदेत केली. फ्रान्समध्ये येत्या 14 ते 22 मे या कालावधीत कान चित्रपट महोत्सव होत आहे.

**नेमबाजी**

आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा महामंडळाच्या विश्व करंडक स्पर्धेत 10 मीटर एअर रायफल प्रकारातील मिश्र दुहेरीत भारताच्या रुद्रांक्ष पाटील आणि आर्या बोस यांना रौप्य पदक मिळालं. पेरुमधील लिमा इथं सुरू असलेल्या या स्पर्धेतलं भारताचं हे तिसरं रौप्य पदक आहे. दोन सुवर्ण पदकांसह भारत पदकतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहे.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल झालेल्या पहिल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने पंजाब किंग्स इलेव्हन संघाचा 7 गडी आणि 7 चेंडू राखून पराभव केला. पंजाब संघाचे 157 धावांचे लक्ष्य बंगळुरू संघाने देवदत्त पड्डीकल आणि विराट कोहली यांच्या अर्धशतकाच्या जोरावर सहज पार केलं. तर दुसऱ्या सामन्यात मुंबई इंडियन्सने चेन्नई सुपर किंग्ज संघाचा 9 गडी राखून पराभव केला. चेन्नईने 176 धावांचं लक्ष्य दिलं होतं; मुंबईनं; रोहित शर्मा आणि सुर्यकुमार यादव यांच्या नाबाद तडाखेबंद अर्धशतकांच्या जोरावर 26 चेंडू राखत हे लक्ष्य पूर्ण केलं.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल.

# नमस्कार